रविवार सत्यवादी ता.१७-९-१९९५ पान नं. ७



# 'वृत्तपत्रामुळेच नर्मदा बचाव आंदोलन यशस्वी होऊ शकले' -श्रीमती मेधा पाटकर

कोल्हापूर, ता.१६- मोठी धरणे बांधून जनतेला पाणी पुरवठा करू शकत नाहीत ही गोष्ट सरकारच्या लक्षात आली आहे. त्यासाठी आम्हाला आंदोलन करावे लागले. वृत्तपत्रांनी या आंदोलनात योग्य ते स्थान दिले. त्यामुळेच हे नर्मदा बचाव आंदोलन यशस्वी होऊ शकले असे उद्‌गार नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या श्रीमती मेधा पाटकर यांनी काढले.

ताराराणी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी भद्रकाली ताराराणी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रेस कौन्सिलचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती पी.बी. सावंत होते.

यावेळी त्या पुढे म्हणाल्या, आंदोलकांनी स्त्रियांची नव्हे तर समाजातील शोषितांची व गोरगरीब्र पिडीत लोकांची व कामगारांची आंदोलने उभी करणे गरजेचे असून कोणतेही आंदोलन असो त्याचा शेवट करणे जरूरीचे आहे. समाजातील सुशिक्षित स्त्री थोड्याफार प्रमाणात आंदोलन करतात. त्याचप्रमाणे प्रशिक्षित घरकाम करणाऱ्या स्त्रियांनीही आपल्या चुलीतील जळते लाकूड मशालरूपाने जोपर्यंत दुसऱ्यांना दाखवत नाहीत तोपर्यंत स्त्रियांचा विकास अशक्य असे सांगून त्या पुढे म्हणाल्या, आंदोलनकर्त्यांनी व समाजाने विकासाच्या दृष्टीने चाललेल्या कामात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी न्या.सावंत म्हणाले, शिक्षण हे समाजाच्या दृष्टीने महत्वाचे अंग आहे. आजचे शिक्षण हे इतर चालणाऱ्या वेगवेगळ्या धंद्याप्रमाणे एक धंदा म्हणून शिक्षण चालले असण्याची खंत व्यक्त करून ते म्हणाले, शिक्षणाची प्रत ही तिथं कार्य करणाऱ्या मुख्याध्यापकाच्या व आध्यापक वर्गाच्या बुद्धीवर अवलंबून असते. त्याप्रमाणे शिक्षण हे व्यासंगावर अवलंबून असते हे शिक्षण क्षेत्रातील लोक विसरून गेले असल्यामुळे शिक्षण संस्था आज बदनाम होत आहेत असे सांगून ते पुढे म्हणाले.

शिक्षण म्हणजे व्यक्तीचा विकास व पुढे जाऊन समाजाचा विकास साधणारे प्रमुख कार्य आहे. म्हणून शिक्षण घेणे गरजेचे आहे. ज्ञानाच्या जोरावर मूठभर लोकांनी समाजावर हजारो वर्ष राज्य केले याचे उदा. भारताचा इतिहास असल्याचे त्यांनी सांगितले.

समाजातील प्रत्येक धर्मात स्त्रियांना बंधनात जखडून ठेवलेले आहे. म्हणून समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जा प्राप्त झालेला आहे. स्त्रियांचा दुय्यम दर्जा हा समाजाच्या मुळाशी निगडीत आहे.

प्रत्येक धर्माने स्त्रियांना बंधनात जखडून ठेवले आहे व त्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. कांही ठिकाणी महिलांनी त्याविरूद्ध आवाज उठविला असून काही देशात स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळत आहे. परंतु बऱ्याच ठिकाणी ही उपेक्षित व भोगवस्तूच राहिली असण्याचेही खंत माजी न्या.सावंत यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुणे म्हणून माजी न्यायमूर्ती पी.बी. सावंत यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आली. यावेळी पंदरकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्याचप्रमाणे डॉ.क्रांतीकुमार पाटील यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांनी शाल, श्रीफळ, गौरवपत्र व पुरस्काराची रक्कम देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

## जिल्हा पोलिस क्रीडा स्पर्धा